# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २१/१०/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी चोरी

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा झुंज शिवार येथे दिनांक १९/१०/२०२२ चे ११.०० सुमारास आरोपी क्र. १. भुरा उर्फ देवेन्द्र राजेन्द्र पवार रा. उमठा याने मोटारसायकल विकत देतो असे म्हणुन फिर्यादी नामे— प्रवीन पुंडलीकराव वंजारी वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र ६ शेदुंरजनाघाट (मलकापुर), ता. वरूड जि. अमरावती यांना झुंज शिवार येथे बोलावुन फिर्यादिस मोटरसायकल न देता ६०,०००/—रू. नगदी हातावरुन घेतले व रेडमी कंपनीचा मोबाईल किमंती २,०००/—रु. शर्टच्या खिशातुन हीसकावुन घेवुन आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २. वय अंदाजे वय २५ वर्ष हे पळुन गेले. आरोपीतांनी असा एकुण ६२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चौधरी पो.स्टे. जलालखेडा मो.नं.८९७५७५५९६९ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील सेंटअॅन्स स्कुल जवळ दहेगाव येथे दिनांक १९/१०/२२ चे २२.०० वा. चे दि २०/१०/२२ चे ०६.०० वा. सुमारास फियादी नामे— शशीधर उमाकांत पंडीत, वय ४४ वर्ष, रा दत्त नगर वार्ड क्र ०२, चनकापुर यांचा घरी श्री फॅशन मोल नावाचे कपडयाचे दुकान आहे. फियादीने आपले दुकान बंद करून घरी गेले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने दुकानाचे दोन्ही शटर वाकवुन दुकानामध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानातुन नगदी ३२,०००/—रू. व दुकानातील कपडे कि. ३९,९००/—रू. तसेच एक पर्स ज्यामध्ये शशीधर उमाकांत पंडीत नावाचा पॅनकार्ड, आधार कार्ड, ड्रायविंग लायसनंस व एमएच—४०/एवाय— ६६११ क्रमांकाची आर सी बुक अशा वर्णनाचा माल व नगदी रूपये असा एकुण कि. ७१,९००/—रू. चा मुदेमाल चोरून नेले. सदर फियादीचे दुकानातील सीसीटीवी कॅमेरात आलेल्या अज्ञात ३ आरोपीतांनी चोरी करून नेला आहे अश्या फियादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते मो.नं. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**